**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** पठारी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0168 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**08/04/2026 20:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिंनाक पासून):** 08/04/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 08/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 13:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 08/04/2026 **Time (वेळ):** 20:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 022

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 08/04/2026 20:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** साई मंदिर रोड,राऊत यांचे कंटीगचे दुकानासमोर, पाथरी,पाथरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** महेश मारुती पाटणकर

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** मारुती पाटणकर

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग, परभण,परभणी, नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग, परभण,परभणी, नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9870313157

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामेश्वर गुरुलिंगअप्पा बिडकर | | वडील का नाम : गुरुलिंगअप्पा बिडकर | 1. दिपनगर, तरोडा नाक्याजवळ,, नांदेड,नांदेड,भाग्य नगर,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 16 नोटा | 8,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकारतर्फे फिंयाद
दिंनाक 08/04/2026
मी महेश मारुती पाटणकर वय 54 वर्ष, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, परभणी मोनं. 9870313157
सरकारतर्फे फिंयादी होवुन फिंयाद देतो कि, मी दिंनाक 29/05/2025 पासुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, परभणी येथे पोलीस उप अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे.
दिंनाक 07/04/2026 रोजी आम्ही लाप्रवि कार्यालयात हजर असताना 12ः:00 वाजण्याचे सुमारास तक्रारदार सुभाष पंडीतराव देशमुख वय 63 वर्ष व्यवसाय-शेती रा. वडी ता. पाथरी यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9960462517 वरुन का◌ॅल करुन त्यांची एका लोकसेवका विरुध्द तक्रार असुन तुम्ही पाथरी येथे येवुन तक्रार घेवुन कार्यवाही करण्याची विंनती केली. त्यामुळे आम्ही त्यांचे तक्रारीबाबत विचारपुस करुन खात्री केली. त्यानंतर आम्ही कार्यकारी अभिंयता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. 2, परभणी यांना पत्र देवुन 1) संतोष पौळ, कालवा निरीक्षक व 2) पंकज खाडगीर, दप्तर कारकुन यांना शासकीय पंच म्हणुन लाप्रवि कार्यालयास 14ः:00 वाजता उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारीबाबत थोडक्यात माहिती देवुन सापळा पथक असे संपुर्ण किट साहित्यासह शासकीय वाहन क्रमांक एमएच 22 बीसी 2057 ने पाथरी कडे 14ः:30 वाजता निघालो◌े. तेथे पाथरी शहराचे अलीकडे एका शेतातील आडोशाचे ठिकाणी शासकीय वाहन 15ः:30 वाजता थांबवुन तक्रारदार यांना बोलावुन घेतले. सदर ठिकाणी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांचा आपासात परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार आम्हास सादर केली. सदर तक्रारीचा थोडक्यात सारांश असा कि, "माझा पुतण्या भालचंद्र त्रिंबकराव देशमुख याचे नावे मौजे वडी ता. पाथरी येथे गट क्र 24 मध्ये 2 एकर 5 गुंठे शेती आहे. ढालेगाव बंधारा च्या बॅकवा◌ॅटरमध्ये माझे पुतण्याची जमीन गेली आहे. त्यानंतर भुमी अभिलेख विभागाकडुन पुर्नवसनासाठी मोजणी करण्यात आली. त्या मोजणीमध्ये माझ्या पुतण्याची जमीन कमी मोजणी करण्यात आली. त्यामुळे माझ्या पुतण्याने एसडीएम, पाथरी यांना षेतीची पुर्नमोजणी करण्यात यावा असा अर्ज केला. त्यावर एसडीएम, पाथरी यांनी पुर्नमोजणी करण्याचे आदेश दिले.
माझ्या पुतण्याला ब्रेन ट्युमरचा आजार असल्याने त्याची तब्येत अचानक बिघडली. त्यामुळे पुतण्या भालचंद्र याने याने शेताचे पुर्नमोजणीचे पुढचे काम करुन घेण्यासाठी अधिकारपत्र दिले. त्यामुळे मी मार्च/2026 मध्ये भुमी अभिलेख कार्यालय, पाथरी येथे पुतण्याचे शेताची पुर्नमोजणी संदर्भात चौकशी साठी गेलो. त्यावेळी कार्यालयातील बिडकर यांनी पुर्नमोजणीसाठी 15,000/-रुपये लागतात असे सांगितले. एसडीएम पाथरी यांनी पुर्नमोजणीचे आदेश काढलेले असल्याने त्यासाठी कोणतीही फिस लागत नाही. त्यामुळे बिडकर साहेब मागत असलेले 15,000/- रुपये ही लाच आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.
आज दिंनाक 07/04/2026 रोजी बिडकर साहेब यांना शेताचे पुर्नमोजणी बाबत विचारपुस करणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही व्हावी हि विंनती." वगैरे मजकुराची तक्रार दिली. सदर तक्रारीची खात्री करुन आम्ही व दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या.
आमचे सुचनेवरुन पोह/आदमे यांनी दोन्ही पंच व तक्रारदार यांना डिव्हीआर बाबत माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक कुठे भेटतील याबाबत विचारपुस केली. त्यावेळी तक्रारदार लोकसेवक हे कार्यालयात भेटतील असे सांगितले. त्यामुळे सर्वानुमते लोकसेवक बिडकर यांचेवर पडताळणी कार्यवाहीसाठी ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 पौळ यांना तक्रारदार यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एमएच 08 एन 3400 ने लोकसेवक बिडकर यांचेकडे पडताळणी करीता पाठविण्यात आले. सदरची पडताळणी कार्यवाही 16ः:19 ते 17ः:00 दरम्यान करण्यात आली. सदर पडताळणी दरम्यान तक्रारदार यांची लोकसेवक बिडकर यांचेशी भेट झाली नाही.

परंतु तक्रारदार यांनी लोकसेवक यांना फोन केला. त्यावेळी लोकसेवक यांनी 1 घंटा लागेल, पाथरीमध्ये आल्यावर का◌ॅल करतो असे म्हणाले. त्यामुळे तक्रारदार व पंच शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व लोकसेवक बिडकर यांचेमध्ये फोनवर संभाषण झाले. त्यावेळी लोकसेवक बिडकर यांनी शेतमोजणी संदर्भात चर्चा केली. तसेच तक्रारदार यांनी मोजणी साठी 8,000/-रुपये फिस भरयला दिले असल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक बिडकर यांनी ते पैसे मोजणीचे झाले, आता तुमच्याकड असतील तर शुभमकड देवुन जाण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी पैसे नसल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक यांनी असतील काही देवुन टाका शुभम आपला नाही का, मेडीकल बालाजी मेडीकल असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी बोलणे टाळले. त्यानंतर लोकसेवक यांनी उद्या म्हणजेच दिंनाक 08/04/2026 रोजी सकाळी भेट घेण्यास सांगितले. त्यामुळे सर्वानुमते दिंनाक 07/04/2026 रोजीची पडताळणी कार्यवाही स्थगित करुन दिंनाक 08/04/2026 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

दिंनाक 08/04/2026 रोजी आम्ही दोन्ही पंच व सापळा पथक असे संपुर्ण किट साहित्यासह शासकीय वाहनाने पाथरी शहराचे अलीकडे एका शेतातील आडोशाचे ठिकाणी शासकीय वाहनासह सकाळी 09◌ः30 वाजता पोहचलो. काही वेळातच तक्रारदार सुभाश देशमुख हजर झाले. काही वेळाने लोकसेवक बिडकर यांचा तक्रारदार यांना फोन आला. त्यावेळी लोकसेवक बिडकर यांनी तक्रारदार यांना भेटण्यास बोलाविले. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक बिडकर यांचेबाबत विचारपुस केली. त्यावरुन सर्वानुमते लोकसेवक बिडकर यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 पौळ यांना तक्रारदार यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एमएच 08 एन 3400 ने लोकसेवक बिडकर यांचेकडे पडताळणी करीता पाठविण्यात आले. सदरची पडताळणी कार्यवाही 09◌ः56 ते 10◌ः27 दरम्यान करण्यात आली. सदर पडताळणी दरम्यान तक्रारदार यांची लोकसेवक बिडकर यांचेशी भेट झाली. त्यावेळी लोकसेवक बिडकर यांचेसोबत शेतमोजणीचे बाबत चर्चा केली. त्यादरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवक यांना फिस बाबत विचारपुस केली. त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे भावाला बोलल्याचा संदर्भाबाबत चर्चा करुन 15,000/-रुपये लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी रक्कम कमी करण्यास विंनती केली. त्यावर लोकसेवक बिडकर यांनी तडजोडअंती 12,000/-रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी काही रक्कम आज देतो व बाकीचे दोन तीन दिंवासानतर देतो असे सांगितले. त्यावर लोकसेवक बिडकर यांनी लाचरक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 पौळ शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आले.

लोकसेवक बिडकर यांनी तडजोडअंती 12,000/-रुपये लाचेची मागणी करुन 8,000/-रुपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यामुळे तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष 500/-रुपये दराच्या एकुण 16 नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर्स पंच क्र 2 खाडगीर यांनी त्यांचे हस्ताक्षरात एका को-या कागदावर लिहले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन सपोउपनि/निलपत्रेवार यांनी तक्रारदार व दोन्ही पंचांना अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अ◌ॅथ्रासिन पावडर बाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर सपोउपनि/निलपत्रेवार यांनी तक्रारदार यांनी जमा केलेल्या 500/-रुपये दराच्या एकुण 16 नोटांना अ◌ॅथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवल्या. त्यानंतर दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा पथकास सापळा कार्यवाही अनुषंगाने सुचना देण्यात आल्या. तसेच लोकसेवकाने लाचरक्कम स्विकारल्यास त्याबाबतचा पुर्व नियोजीत इशारा बाबत सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक कुठे भेटतील याबाबत विचारपुस केली. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक बिडकर यांना फोन कुठे भेटायचे याबाबत विचारले. त्यावेळी लोकसेवक बिडकर यांनी भुमी अभिलेख, कार्यालय, पाथरी येथे भेटण्यास सांगितले. त्यामुळे सर्वानुमते लोकसेवक बिडकर यांचेवर भुमी अभिलेख कार्यालय, पाथरी येथे सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 पौळ यांना तक्रारदार यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एमएच 08 एन 3400 ने लोकसेवक बिडकर यांचेकडे सापळा कार्यवाही करीता पाठविण्यात आले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र 2 खाडगीर, सापळा पथक असे शासकीय वाहन व स्कुटीने तक्रारदार यांचे पाठोपाठ गेलो. तक्रारदार यांनी त्यांची मोटारसायकल हि साई मंदिर रोडवरील शाहीन हा◌ॅटेलच्या बाजुस असलेल्या कंटीगचे दुकानासमोर लावली. त्यामुळे सापळा पथक आजुबाजूस थांबले. काही वेळाने एक इसम त्यांचे मोटारसायकलवर आला व तक्रारदार यांचेजवळ गेला. काही वेळातच तक्रारदार यांनी त्यांचे डोक्यावरील रुमाल काढुन हातास गुंडाळून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यामुळे आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक बिडकर यांना लाचरकमेसह ताब्यात घेतले. सदरची सापळा कार्यवाही हि 13◌ः00 ते 13◌ः18 वा दरम्यान करण्यात आली.

आज दिंनाक 08/04/2026 रोजी 09◌ः56 ते 10◌ः27 वा करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक बिडकर यांनी पंचासमक्ष तक्रारदार सुभाष् देशमुख यांना त्यांचे पुतणे भालचंद्र देशमुख यांचे वडी येथील

शेतजमीनीची पुर्नमोजणीसाठी तडजोडअंती 12,000/-रुपये लाचेची मागणी करुन काही रक्कम आज स्विकारुन उर्वरीत रक्कम दोन-तीन दिवसानतर स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर आज दिंनाक 08/04/2026 रोजी 13ः00 ते 13ः18 वा करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान साई मंदिर रोड, राऊत यांचे कंटीगचे दुकानासमोर, पाथरी येथे लोकसेवक बिडकर यांनी पंचासमक्ष तक्रारदार सुभाष देशमुख यांचेकडुन 8,000/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. त्यादरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवक बिडकर यांना सदर रकमेच्या पावती बाबत विचारपुस केली. त्यावर लोकसेवक बिडकर यांनी याच काही नाही, तारीख काढायची मग डायरेक आता असे म्हणुन पावती न देता लाचरक्कम स्विकारली आहे.
म्हणुन माझी आरोपी लोकसेवक रामेश्वर गुरुलिंगअप्पा बिडकर वय 45 वर्ष पद-निमतानदार नेमणुक उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, पाथरी मुळ रा. देवेगाव ता. पाथरी ह.मु. दिपनगर, तरोडा नाक्याजवळ, नांदेड गट-क यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

फिंयाद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
LAXMAN MADHAVRAO KENDRE(I (Inspector)) / POBN82264 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): LAXMAN MADHAVRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN82264

ASI 8/4/2026
पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.पाथरी जि.परभणी